# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र. विकमं/२०१३–१४/५४७ दिनांक : ०४/१२/२०१३.

## स्मरणपत्र

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक**

सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबतच्या अहवालाबाबत....**

**संदर्भ क्र. :– या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०१३–१४/९८३, दि. ०५/०६/२०१३**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने **महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९** लागू केला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या अधिनियमांची पुरेशी माहिती किंवा त्या विषयांच्या परिणामांचे गांभीर्य नसल्यामुळे रॅगिंगच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. भविष्यात रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापकस्वरूपात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी, मान्यताप्राप्त संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर अधिनियमांची माहिती करून विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगचे प्रकार प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने यापूर्वीच विस्तृतस्वरूपात वरील संदर्भिय पत्र व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेला तक्ता आपणांस पाठविण्यात आलेला आहे.

आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **३१ जानेवारी, २०१४ पूर्वी** विद्यापीठाच्या मा. सचिव, रॅगिंग संनियंत्रण यांना (विद्यार्थी कल्याण मंडळ) पाठविण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे-४११००७. पुणे विद्यापीठ

संचालक,

विद्यार्थी कल्याण मंडळ